# Minor Research Project

**File No. – F-23-1542/14 (General)/40(WRO)XII Plan**

# Executive Summary of the Project

**Principal Investigator - R. B. Pawar**

## संत तुकारामांचे लोकरंजनातून समाजप्रबोधन

संत बहिणाबाईंनी गौरव केल्याप्रमाणे -

'संतकृपा झाली। इमारत फळा आली।।

ज्ञानदेवे रचिला पाया। उभारिले देवालया।।

नामा तयाचा किंकर। तेणे रचिले ते आवार।

जनार्दन एकनाथ। खांब दिला भागवत।।

तुका झालासे कळस। भजन करा सावकाश।।'

ज्या भागवतधर्माच्या इमारतीचा पाया संत ज्ञानदेवांनी रचना नामदेव एकनाथांनी या इमारतीला खांब देवून आवार रचले त्या भागवत धर्माच्या इमारतीचे कळस होण्याचा मान संत तुकारामांना लाभला. यावरून संत मंडळात संत तुकारामांचे स्थान निश्चितच लक्षात येते. ज्याचा प्रपंच फसला, पुर्ण धंदा बुडाला, समाजामध्ये ज्याची हेटाळणी झाली, समाजाने ज्याला वाळीत टाकले, ज्याला बडविले, कर्जबाजारी झाले, त्याची मोठी संपत्ती असलेली अभंगाची वही इंद्रायणीत बुडविली परंतू तरिही हे सर्व सहन करून जो आपल्या भूमिकेवर ठाम राहिला व 'बुडता हे जन न देखवे डोळा, म्हणवुनी कळवळा येत असे' अशाप्रकारे समाजातील जनसामान्यांविषयी कळवळा येवून समाजाकरिता अखेरच्या श्वासांपर्यंत लढणारा थोर लढवय्या म्हणजे भागवतधर्माच्या इमारतीचा कळस संत तुकाराम होय. ज्ञानेश्वर, नामदेव, एकनाथ यांनी आपल्या कालखंडात सुरूकेलेली

समाजोद्धाराची चळवळ त्यांच्यानंतर कित्येक वर्षांनी संत तुकारामांनी पुढे चालविली. अभंगाचे शस्त्र हाती घेवून अख्खा समाज बदलविण्याकरिता पुढे आलेला थोर संत म्हणजे संत तुकाराम महाराज होय. समाजाकरिता केलेल्या आपल्या कार्यामुळे 'अणुरेणुहून थोकडा' असणारा तुका आभाळाएवढा झाला.

संत एकनाथांप्रमाणेच लोकरंजनातून लोकशिक्षण देणारे ते एक थोर लोकशिक्षक होते. त्यांच्या कार्यकर्तृत्वामुळे ते खऱ्या अर्थाने लोकात्मा ठरतात. संतचरित्रात अनेक चमत्कार आलेले आहेत तेच संत तुकारामांच्या बाबतीतही घडले. परंतू राजा मंगळवेढेकर म्हणतात त्याप्रमाणे चमत्काराकडे चमत्कार म्हणूनच पाहावे. खऱ्या अर्थाने पाहू जाता आपल्या आयुष्यभर त्यांनी चमत्काराला विरोधच केला. पण असे असले तरी त्यांच्याच जीवनाशी अनेक चमत्कार जोडले गेले मग इंद्रायणीत बुडविलेल्या अभंगाच्या वही ईश्वरकृपेने वर जशीच्या तशी येणे असो वा तुकाबांचे विमानात बसून सदेह वैकूंठाला जाणे असो संत तुकाराम हे चमत्कारी पुरूष नसून प्रस्थापित समाजव्यवस्थेविरूद्ध जे बंड केले त्यामुळे ते बंडखोर ठरतात, विद्रोही ठरतात.

'कोणी निंदा कोणी वंदा।
आम्हां स्वहिताचा धंदा।।
काय तुम्हासी गरज।
आम्ही भजूं पंढरिराज।।'[१]

कोणी कितीही निंदा केली किंवा वंदन केले तरी आम्ही आमच्या स्वहिताचा धंदा कधीच सोडणार नाही असा आशावादी दृष्टिकोन ते मांडतात. मुळातच हे संस्कार त्यांच्यावर लहानपणीच झाले. अतिशय श्रद्धाळू अशा कुटूंबात इ. स. १५९८ मध्ये संत तुकारामांचा जन्म झाला. त्यांचे आईवडील दोघेही श्रद्धाळू व भक्तहृदयी होते. त्यांचे निश्चितच परिणाम त्यांच्यावर झाले. तुकाराम कालीन समाजाची परिस्थिती संत

एकनाथ महाराजांच्या काळापासून फारशी वेगळी नव्हती. समाजामध्ये त्यावेळी खोट्या साधुंचा जिकडे-तिकडे सुळसुळाट झाला होता. धर्म अस्तित्वात होता परंतू या धर्माला काही स्वार्थी लोकांनी विकृत रूप प्राप्त करून दिले होते. सावकारशाहीत सामान्य माणसांची गळचेपी सुरू होती.

अंधश्रद्धा तर समाजात पुर्वापार ठाण मांडून बसलेली होतीच. जातभेद
मोठ्या प्रमाणावर पाळल्या जात होता. जाती-जातीत रोटी-बेटी व्यवहाराला वाव नव्हता. सटवाई, जाखाई, जोखाई, मरीआई, खंडोबा या देवता समाजात ठाण मांडून होत्या. या क्षुद्र देवतांना प्रसन्न करण्याकरिता जपजाप्य, नवस-सायास, पुजाविधी आदी कर्मकांड समाजामध्ये फोफावल्या होत्या. बळी प्रथा अस्तित्वात होती.

सामाजिक विषमता, आर्थिक विषमता, धार्मिक विषमता सोबतीला होतीच. एकंदरित समाज अंधकाराच्या एक खोल गर्तेत लोटल्या गेला होता. समाजाचे एकुणच नैतिक मूल्य ढासळले होते. त्यातच पडलेल्या भयंकर दुष्काळामुळे तर ही परिस्थिती अधिकच गंभीर झाली होती. त्याची झळ स्वत: संत तुकारामांना सुद्धा बसली. पत्नी व मुलगा त्यांच्या डोळ्यादेखत भुकेमुळे तडफडत मेले. कुटुंबाचा आधार गेला. धंदा बुडाला, लोकांकडे कर्ज थकले यामुळे संत तुकारामांना विरक्ती प्राप्त झाली व सत्याच्या शोधार्थ ते भंडारा डोंगरावर गेले व येथूनच त्यांच्या खऱ्या सामाजिक जीवनाला सुरूवात झाली.

यानंतर समाजप्रबोधनाचे मोठे कार्य त्यांनी हाती घेतले. त्यांना अनिष्ट प्रथा, परंपरा व कर्मकांड आदी अंधश्रद्धांच्या आहारी गेलेल्या समाजाला बाहेर काढायचे होते म्हणून समाजाकरिता कार्य करण्याकरिता ते तत्पर झाले. आपल्या आयुष्याच्या शेवटपर्यंत त्यांनी कीर्तनाच्या माध्यमातून समाजद्रोह्यांना ठणकाविले. प्रथा, परंपरांवर आघात केले. अंधश्रद्धा पसरविणाऱ्या ढोंगी साधूंना धारेवर धरले. कीर्तन या संस्थेचा

त्यांनी त्यांच्या कार्याकरिता एक प्रभावी शस्त्र म्हणून वापर करून घेतला. आपल्या आयुष्याच्या शेवटपर्यंत त्यांनी कीर्तनाच्या माध्यमातून समाजप्रबोधन केले. हे कार्य करतांना त्यांना अनेकांच्या विरोधाचा सामना करावा लागला, समाजात त्यांचे अनेक शत्रु निर्माण झाले ज्यामध्ये मोठ्या संख्येने पुरोहितवर्ग व साधूवर्ग होता. खुद्द त्यांच्या स्वतःच्या घरातुनच पत्नी जिजाबाईनी त्यांना मोठा विरोध केला परंतू संत तुकाराम आपल्या क ार्यापासून तिळभर देखिल मागे सरले नाही, ते अविचल राहिले हे त्यांचे मोठे कर्तृत्व मानावे लागेल.

## कीर्तनाच्या माध्यमातून नैतिक आचरणाची शिकवण

संत तुकाराम महाराजांनी आपल्या अभंगातून समाजाला अध्यात्माची शिकवण दिली. खरा धर्म काय असतो हे समाजाला सांगितले. साधू कोणाला म्हणावे याचे यथोचित मार्गदर्शन केले. खऱ्या अर्थाने संत ज्ञोनश्वर, संत नामदेव व संत एकनाथांच्या नंतर निर्माण झालेली समाजसुधारणेची पोकळी त्यांनी आपल्या कार्यकतृत्वाने भरून काढली. समाज हेच जणू त्यांचे कुटुंब बनले.

'पोर मेले बरें झालें।
देवे मायेविरहित केले।।
माता गेली मज देखता।
तुका म्हणे हरलो चिंता।।'[२]

कुटुबांच्या सर्व बंधनातून मुक्त होवून समाजातील सेवा करण्यातच त्यांनी धन्यता मानली. 'बोले तैसा चाले त्याची वंदावी पाऊले' या त्यांच्याच उक्तीनुसार त्यांचे आचरण होते म्हणून फक्त सावकारशाही संपावी अशी नुसती वटवट न करता आपल्याकडे गहान असलेल्या लोकांच्या जमिनीचे दस्तावेज त्यांनी गाठोडे बांधून इंद्रायणीत बुडविले. त्यांच्या दृष्टीने संतपण अथवा साधुत्व हे त्याच ठिकाणी दिसून येते जेथे रंजल्या गांजल्यांची सेवा

करण्यातच आपला धर्म समजल्या जातो.

'जे कां रंजले गांजले।
त्यांसि म्हणे जो आपुले।।

तोचि साधु ओळखावा।

देवे तेथेंचि जाणावा।।'[३]

देव हा कोणत्या दगडात अथवा कोणत्या मंदिरात वास्तव्य करत नसून त्याचे अस्तित्व रंजल्या गांजल्या लोकांच्या पीडित लोकांच्या सेवेतच खरा देव आहे. संत तुकारामांना माणसात देव दिसला आणि माणसातील हाच देव त्यांनी समाजाला सुद्धा दाखविण्याचा प्रयत्न केला. मानवसेवेतच ईश्वरसेवा आहे असा सोपा उपदेश त्यांनी लोकांना दिला व बाह्य अवडंबरापासून सावध राहण्याचा समाजाला एक मौलिक सल्ला दिला. संत तुकाराम हे मुळातच एक व्यापारी होते व समाजाचे उन्नयन करण्याचा व्यापार त्यांनी आयुष्यभर केला. समाजप्रबोधन करण्याचे कीर्तन हे मोठे साधन आहे हे त्यांनी ओळखले व कीर्तनाचा त्रास येणाऱ्या लोकांचा त्यांनी प्रखर शब्दात उपहास केला.

'कीर्तनाचा विकरा मातेचे गमन।

भाड खाई धन विटाळ तो।।

हरिभक्ताची माता हे हरि गुण कीर्ति।

इतवर पोट भरिती चांडाळते।

अत्यंज हा ऐसे कल्पांती करीना।

भाड हे खाईना जननीची।।

तुका म्हणे त्यांचे दर्शन ही खोटे।

पुर्वजासी नेटें नरकां धाडी।।'[४]

कीर्तनाचा त्रास येणाऱ्याला संत तुकारामांनी मातृगमनी म्हणून त्याची प्रखर शब्दात निंदा केली आहे. कीर्तनाचा वापर पोट भरण्याकरिता करणारे अनेक कीर्तनकार, ब्राम्हण, पुरोहित त्याकाळी अस्तित्वात होते. पोट भरण्याकरिता कीर्तनाचा व्यवसाय करणाऱ्या लोकांना त्यांनी चांडाळ ठरविले आहे व असे लोक पोटासाठी आपल्या जननीलाही विकायला

मागे-पुढे पाहणार नाही अशा प्रखर शब्दात ते अशा लोकांची निंदा करतांना दिसतात.

संत तुकोबांच्या काळात सर्वत्र अंधश्रद्धेने थैमान घातले होते. या बिकट परिस्थितीत सामान्य व्यक्ती दबल्या जात होता. प्रारब्ध, नशिब, अंगात देवाचा संचार होणे, आपल्या इच्छांच्या पुर्ततेकरिता देवाला नवस बोलणे आदी बाबी त्या काळात सर्रासपणे सुरू होत्या. संत तुकारामांनी या समाजविघातक गोष्टीला ओळखले व समाजाला अंधश्रद्धामुक्त करण्याचा एकच ध्यास घेतला. आपल्या कीर्तनांतून, प्रवचनांतून, अभंगातून त्यांनी अंधश्रद्धेचे फोलपण सिद्ध केले. हे सर्व करीत असतांना त्यांनी वापरलेला बुद्धिप्रामाण्यवाद पाहण्यासारखा आहे.

'वैद्य वाचविती जीवा। तरी कोण ध्याते देवा।।१।।
काय जाणो कैसी परी। प्रारब्ध ते ठेवी उरी।।२।।
अंगी दैवत संचरे। मग तेथे काय उरें।।३।।
नवसे कन्यापुत्र होती। तरी कां करणें लागे पती।।४।।
जाणे हा विचार स्वामी तुकयाचा दातार।।५।।'[५]

संत तुकाराम किती बुद्धिप्रामाण्यवादी होते याचा उत्तम नमूना म्हणजे त्यांचा वरील अभंग. वैद्य जर आपल्या प्राणांचे रक्षण करतो तर मग आपण देवाचा धावा कशाकरिता करतो. अंगात जर देवी-देवतांचा संचार होत असेल तर बोलायला काहीच शिल्लक राहात नाही. नवसाने जर कन्या-पुत्र होत असेल तर पती करण्याची गरजच उरली नसती. वरील ओळीतून तर त्यांनी आपल्या प्रतिभेचा कळसच गाठलेला आहे. तत्वनिष्ठ, बुद्धीप्रामाण्य, विज्ञाननिष्ठ असे ते बहुआयामी व्यक्तिमत्व ठरतात. एखाद्या संशोधकाच्या भूमिकेतून ते समाजाशी संवाद साधतांना दिसतात. म्हणून वर उल्लेख केल्याप्रमाणे संत तुकाराम व चमत्कार यांच्यात थोडादेखील

संबंध नाही. 'तुका झालासे कळस' ही बहिणाबाईंची उक्ती येथे अगदी यथोचित वाटते.

संत तुकाराम महाराजांनी समाजाला नैतिक आचरणाची शिकवण देवून अंधश्रद्धेला दूर लोटण्याची शिकवण समाजाला दिली. त्यांच्यानंतरच्या समाजसुधारकांसाठी संत तुकारामांनी केलेले कार्य मैलाचा दगड ठरते. आधुनिक काळातील संत गाडगेबाबा संत तुकाराम महाराजांना आपले गुरू मानतात ते उगाच नव्हे. अवघा महाराष्ट्र 'ज्ञानोबा-तुकाराम' या गजरात दुमदुमतो ते उगाच नव्हे.

'सुंदर ते ध्यान उभें विटेवरी।
कर कटावरी ठेवूनियां।।
तुलसीहार गळां कासे पीतांबर।
आवडे निरंतर तेंचि रूप।।'[६]

असा सर्वसामान्यांना जवळचा वाटणारा, सर्वसामान्यांना परवडणारा देव त्यांनी समाजाला दिला व ईश्वरप्राप्तीकरिता त्यांची होणारी गळचेपी त्यांनी थांबविली. मोक्षप्राप्तीमध्ये गुंतुन न पडता मनाला प्रसन्न करणे हेच सर्व सिद्धीचे कारण आहे हे त्यांनी ठासून सांगितले. अध्यात्मिक मार्गात कोणाच्याही भूलथाप्यात न जाण्याकरिता ते समाजाला सजग करतात. परमार्थाची शिकवण अगदी सुलभ पद्धतीने त्यांनी आपल्या भजनातून लोकांना दिली म्हणून ते नेहमीच लोकशिक्षक भासतात.

'मन करा रे प्रसन्न।
सर्व सिद्धीचे कारण।।
मोक्ष अथवा बंधन।
सुख समाधान इच्छा ते।।'[७]

मनाच्या प्रसन्नतेला त्यांनी इतर कोणत्याही गोष्टीपेक्षा महत्वाचे स्थान दिलेले आहे. मोक्ष अथवा बंधन हे आपल्या इच्छेत आहे असा सुलभ संदेश ते आपल्याला देतात.

'सुखाचिया पेठे घातिला दुकान।
मांडियेला वान रामनाथ।।'

(सार्थ श्री तुकारामाची गाथा)

अशा पद्धतीने मी एक दुकानदार आहे व सुखाच्या बाजारामध्ये रामनामाचा माल विकतो आहे असे ते म्हणतात.

## तुकोबांचे दांभिकतेवर प्रहार

संत नामदेवांची कीर्तन परंपरा पुढे चालविण्याचे महत्तम कार्य श्री तुकारामांनी केले. 'सत्य-असत्याशी मन केले ग्वाहीं। मानियेले नाही बहुमतां' याच उक्तीनुसार त्यांनी आपले कार्य आयुष्यभर केले व त्याकरिता कीर्तनाचे प्रभावी माध्यम त्यांनी वापरले. संत तुकाराम महाराजांनी शब्दाचे महत्व जाणले व समाज जर अंतरर्बाह्य बदलवायचा असेल तर या शब्दांच्या शस्त्रांचा वापर करावा लागेल.

'आम्हां घरी धन शब्दांचीच रत्ने।
शब्दांचींच शस्त्रे यत्न करूं।।
शब्दचिं आमुच्या जीवाचे जीवन।
शब्दे वांटू धन जनलोका।।'

आपल्या जवळ असलेले शब्दांचे मोठे धन जनसामान्यांना वाटून त्यायोगे त्यांना शब्दक्रांती घडवून आणायची होती आणि ती घडलीसुद्धा. आधी उल्लेख केल्याप्रमाणे त्यावेळी परिस्थिती अवाक्याबाहेर गेली होती. भक्तीचे स्तोम सर्वत्र माजले होते. बाह्य अवडंबराला महत्व प्राप्त झाले होते. दगड पुजणाऱ्यांची संख्या दिवसेंदिवस वाढीस लागली होती. अशा या समाजाला

विपरित मार्गावर नेवू पाहणाऱ्या दांभिकांना प्रखर इशारा संत तुकाराम देतात. खालील अभंगातील त्यांची प्रखरता पाहण्यासारखी आहे.

'मऊ मेणाहून आम्ही विष्णू-दास।
कठिण वज्रास भेदूं ऐसे।।
मेले जित असों निजोनियां जागे।
जो जो जें जें मागे तें तें देऊ।।
भले तरे देऊं कासेची लंगोटी।
नाठाळाचे काठी देऊं माथा।।'

(सार्थ श्री तुकारामाची गाथा)

समाजात अंधश्रद्धा पसरवू पाहणाऱ्या नाठाळांच्या माथी काठीचा प्रहार करण्यासही तुकोबा मागे-पुढे पाहात नाही. मेणाहून मऊ असणारे तुकोबा प्रसंगी वज्रापेक्षाही कठोर होण्याची भाषा बोलतात. खऱ्या अर्थाने संत तुकाराम महाराज एक समाज क्रांतीकारक होते. समाजाला नेहमीच नवीन दिशा देण्याचे कार्य त्यांनी केले, यात त्यांचा सिद्धहस्त होता.

संत तुकारामांचे अभंग हे जागृतीचे व आचारसंहितेचेच अभंग होत. संत एकनाथानंतर अभंगाचा एवढा प्रभावी वापर फक्त संत तुकाराम महाराजच करू शकले यात तिळभरही शंका उरत नाही. संत तुकारामांनी समाजाला सांगितलेली आचारप्रणाली ही अभिनव होती. एकीकडे परमात्मा आणि दुसरीकडे समाज या दोघांमध्ये सुंदर समन्वय संत तुकाराम महाराजांनी साधला. देव ही कल्पना व समाज या दोहोंकडे पाहण्याची त्यांची दृष्टी अतिशय डोळस स्वरूपाची होती. तुकारामांच्या काळात खोट्या साधुंचा सर्वत्र सुळसुळाट झाला होता. आपल्या अनेक अभंगांतून त्यांनी या खोट्या साधुत्वावर, दांभिकतेवर हल्ले चढविले व अंधश्रद्धेविरूद्ध लोकांच्या भावना चेतविण्याचे मोठे कार्य केले.

'डोई वाढवूनी केश। भूते आणिती अंगास।।
मेळवूनि नर-नारी। शकून सांगती नानापरी।।
तुका म्हणे मेंद। नाही तयापाशी गोविंद।।

(सार्थ श्री तुकारामाची गाथा)

डोक्यावर जटा वाढवून व अंगामध्ये भूतांचा संचार करून घेवून, लोकांना एकत्र करून त्यांना शकुन सांगण्याचा उपद्व्याप करणाऱ्या ढोंग्यांना आपल्या अभंगामधून संत एकनाथांनी लाथाडले, त्यांचे प्रत्येक डाव हानून पाडले. त्यांच्या कवित्वासोबतच समाजाप्रती असणारा प्रेमभाव नेहमीच प्रत्ययास येतो.

वेदांचे स्तोम माजविणारे पढीक पांडित्य तर नेहमीच त्यांचे लक्ष्य राहिले. वेदांचे पठण करून कोणी मोठा होत नाही. मोठे होण्याकरिता ज्ञान असावे लागते असे त्यांचे विचार होते.

'वेदांचा तो अर्थ आम्हांसीच ठावा।
येरांनी वाहावा भार माथा।।
खादल्याची गोडी देखिल्यासी नाही।
भार धन वाही मजुरीचे।।'

पढीक पांडित्यावर असा खुला प्रहार संत तुकाराम करतांना दिसतात. वेदांना ज्या काळात परमोच्च मानले जायचे त्याकाळी वेदांवर असे भाष्य करणारा तुकोबांसारखा महापुरूष विरळाच. ज्या वेदांपासून जनसामान्य बहुजनांना जाणीवपुर्वक दूर ठेवण्यात आले होते त्या सामान्य बहुजनांना म्हणूनच संत तुकाराम आपलेसे वाटतात, जिव्हाळ्याचे वाटतात हे स्वाभाविकच आहे. त्यांनी केलेले हे कार्य समाजसुधारणेची एक नवीन नांदीच ठरली. अंधारात सापडलेल्या समाजाला प्रकाशाचे किरण दाखविण्याचे कार्य संत तुकारामांनी केले. तुकाराम हे खरोखर युगपुरूष

ठरतात. संत तुकारामांचे आज एकूण ५००० अभंग उपलब्ध आहेत. त्यांची एवढी अफाट वाङ्मयरचना त्यांच्या बुद्धीमत्तेची प्रचिती देते.

'ऐसे संत जाले कळी। तोंडी तमाखूची नळी।।
स्नानसंध्या बुडविली। पुढे भांग वोढविली।।
भांगभुर्का हे साधन। पची पडे मद्यपान।।
तुका म्हणे अवघे सोंग। तेथे कैचा पांडूरंग।।'

(सार्थ श्री तुकारामाची गाथा)

'लोकांस सांगे ब्रम्हज्ञान, स्वतः कोरडे पाषाण' या उक्तीप्रमाणे लोकांना ज्ञान सांगून स्वतः मात्र अज्ञानीच राहणाऱ्या खोट्या संताविषयी परखड विचार संत तुकाराम महाराज व्यक्त करतात. आजही त्यांच्या विचारांची उपयोगिता संपलेली नाही हे यावरून सिद्ध होते.

## दगडाच्या देवाला विरोध

आपले लौकिक व पारमार्थिक विचार संत तुकोबा आपल्या अभंगातून व्यक्त करतात. धर्माच्या व नीतीच्या शुद्ध स्वरूपाच्या आचरणाचा महत्वाचा उपदेश ते समाजातील सर्वसामान्यांना करतांना दिसतात. धर्माच्या नावाखाली दगडाला देव मानून त्याची आराधना क रणाऱ्याला ते चांगलेच सुनावतात. दगडाच्या देवाची निर्मिती ही मनुष्याच्या कल्पनाशक्तीतून झाली आहे व ती काही स्वार्थी व ढोंगी लोकांनी आपल्या स्वार्थासाठी जाणीवपुर्वक केली आहे. म्हणून ही बाब ओळखून अशा खोट्या देवापासून दूर राहण्याचा सावधानतेचा इशारा ते लोकांना देतात.

'रंडचंड शक्ती। मद्य मांस भक्षिती।।
बहिरव खंडेराव। रोटी सुटीसाठी देव।।
गणोबा विक्राळ। लाडुमोदकांचा काळ।।

मुंज्या म्हैसासुरे। हे तो कोण लेखी पोरे।।
वेताळे फेताळे। जळो त्याचे तोंड काळे।।
तुका म्हणे चित्ती। धरा रखुमाईचा पती।।'

(सार्थ श्री तुकारामाची गाथा)

शक्ती, बहिरव, खंडेराव, मुंज्या, म्हैसासूर, गणोबा, वेताळे, फेताळे या देवतांचा त्याग करून फक्त विठ्ठलाचे स्मरण करण्याचा सल्ला ते समाजाला देतात. आपल्या मनात असलेली भिती व सुखप्राप्तीच्या उद्देशाने या क्षुद्र देवतांची निर्मिती होवून लोक आपसुकच त्याच्या आहारी जावून आयुष्याचा सर्वनाश ओढवून घेतात. यामुळे समाजात अंधश्रद्धा अधिकच फोफावत जाते. त्याकाळात संत तुकारामांनी व्यक्त केलेले विचार लोकांना अंधश्रद्धेच्या जंजाळातून बाहेर काढणारे होते. संत तुकारामांनी मूर्तिपूजेला विरोध केला, मग ते विठ्ठलाच्या मुर्तीपुढे का नतमस्तक होतात असा प्रश्न सहजच उपस्थित होतो. त्यांनी विठ्ठलाच्या मुर्तीला आळविले ते म्हणजे एक व्यक्ती म्हणून, एक प्रेरणा म्हणून. साकार उपासनेला त्यांनी केलेला विरोध जनसामान्यांची धार्मिक भावना जोपासण्याचा त्यांचा प्रयत्न कौतुकास्पद होता. या क्षुद्र देवतांच्या आहारी जावून आपणच आपल्या पायावर धोंडा मारून घेतो व समाजाचे एक घटक या नात्याने तो समाजाचेही नुकसान करून घेतो. समाजाला या अवनतीपासून वाचवायचे असेल तर अशा खोट्या देवाच्या पूजेपासून स्वतःला दूर ठेवणे कधीही चांगले. जाखाई, जोखाई, म्हसोबा, वेताळ, म्हसको, मैराळ या देवतांपासून लोकांना सावध राहण्याचा इशारा संत तुकाराम महाराज देतात. हे सर्व सोडून भक्ती करण्याकरिता त्यांनी सुलभ नाममहिमा लोकांना सांगितला.

'धर्माचे पाळण। करणे पाखांड खंडण।।
हेचि आम्हां करणे काम। बीज वाढवावे नाम।।

तीक्ष्ण उत्तरे। हाती घेऊनि बाण फिरे।।

नाही भीड भार। तुका म्हणे साना थोर।।

असे सांगून

'अठरा पुराणांचे पोटी।

नामावीण नाही गोठी।।

आपल्या जीवनकार्याचे प्रयोजनच धर्माचे पालन करून नामाचे बीज वाढविणे हे आहे. नामाच्या पुढे अठरा पुराणांमध्ये सांगितलेले तत्वज्ञान देखील कमी ठरते म्हणून वेळीच सावध होण्याचा सल्ला ते लोकांना देतात.

'केला मातीचा पशुपती।

परि मातीसी काय महती।।

शिवपूजा शिवासी पावे।

माती मातीमाजी समावे।।'[८]

अशारितीने सर्व मातीच्या मुर्ती शेवटी मातीतच जावून मिळतात. हे सर्व थोतांड आहे, सर्व खोटे आहे असे तुकोबा आपल्याला सांगतात.

'फटकाळ तो देव फटकाळ तो भक्त।

करवितो घात आणिका जीवा।।

तुका म्हणे अवघे फटकाळ हे जन।

अनुभवी ये खुण जाणतील।।'[९]

अशा देव आणि भक्त अशा दोघांनाही ते फटकाळ मानतात. अशा वृत्तीमुळे असे लोक स्वतःचा व दुसऱ्याचा सुद्धा घात करून घेतात. अनुभवी लोकच हे मर्म जाणू शकतील असेही संत तुकाराम सांगतात. परंपरेने सामान्यांना अंधश्रद्धेच्या अंधारात ठेवून त्यांच्या तव्यावर आपली पोळी भाजणाऱ्यांना संत तुकाराम झिडकारतात. हे सर्व ते सांगू शकले

कारण याचा अनुभव त्यांनी स्वत: घेतला होता. त्यांच्या सभोवती हे सर्व प्रत्यक्षात घडत होते. एकप्रकारे ते अनुभवाचे बोल होते.

विष्णू नरहरी जोग यांच्या मतानुसार, "आमच्या देशाचा जो ऱ्हास झाला, तो धर्मवेडामुळेच होय. आज जी सुधारलेली राष्ट्रे जगाच्या पुढे आलेली आहेत, त्यांच्यामध्ये एकवेळ धर्माचे वेड होते, त्यावेळी ती अवनतावस्थेत होती व त्यावेळेस त्यांच्यात कोणतीही क्रांती घडून आलेली नव्हती. पण हळुहळू त्यांच्यात विचारी माणसे निर्माण होवून त्यांनी धर्मवेड नाहिसे केले. त्यामुळे त्यांच्यामध्ये सर्वप्रकारची क्रांती घडून येवून, आज ती उन्नतावस्थेच्या शिखरावर येवून बसली आहेत. तेव्हा आपला देश उन्नतावस्थेत येण्यास आपल्यातील धर्मवेड नाहिसे केले पाहिजे. त्याखेरीज आपला देश इतर राष्ट्रांप्रमाणे वर येणार नाही."[१०] त्यांचे मत लक्षात घेतल्यास आपल्यातील धर्मवेड बाजूला करणे किती गरजेचे आहे हे लक्षात येते. हेच कार्य संत तुकारामांनी आपल्या काळात केले.

## अभंगाच्या माध्यमातून समाजाला नीतिबोध

सतराव्या शतकातील संस्कृती आणि भाषेचे स्वरूप आपल्याला संत तुकारामांच्या वाङ्मयातून दिसून येते. त्यांची कविता म्हणजे जणू संतसाहित्याचा कळसच म्हणावा लागतो. साऱ्या समाजाला नीतिमूल्यांची आठवण आपल्या साहित्यातून करून देणारे महान संतसाहित्यिक म्हणजे संत तुकाराम होय. आपल्यावर अन्याय होत असेल तर तो दूर करण्यासाठी आपल्याला क्रांतीकारक पाऊल उचलावे लागेल असे ते सुचवितात.

'पाया झाला नारू। तेथे न बांधा कापुरू।।
तेथे बिबव्याचे काम। अधमासि तो अधम।।
देवावरी विंचू आला। देवपूजा नावडे त्याला।।

तेथे पैजारेचे काम। अधमासि तो अधम।।'[११]

प्रसंगी जशास तसे वागण्याची सूचना संत तुकोबाराय करतात. वास्तविकतेचे भान ठेवून संत तुकाराम समाजाला जगायला शिकवितात. संत तुकारामांना शसक्त समाज घडवायचा होता म्हणून समाजातून अंधश्रद्धेची ही जळमटे त्यांना काढून टाकायची होती. जे कोणी मनास वाटेल ते कर्म आचरण करून आपणास साधु म्हणवितात, ते असे भोंदू जगामध्ये का निर्माण झाले ?, सर्वांगाला राख लावून लोकांचे डोळे चुकवून जे पापकर्म करतात, जगामध्ये वैराग्य दाखवून जे विषयांचा सोहळा भोगतात अशांबद्दल तुकाराम आपल्या अभंगातून म्हणतात, अशांची कोणी संगतही करू नये. अशा भोंदू साधूंविषयी किती म्हणून सांगावे ?

'ऐसे कैसे झाले भोंदू। कर्म करोनि म्हणती साधू।।१।।
अंगी लावूनियां राख। डोळे झाकुनि करिती पाप।।२।।
दावुनि वैराग्याची कळा। भोगी विषयांचा सोहळा।।३।।
तुका म्हणे सांगो किती। जळो तयाची संगती।।४।।'[१२]

अशा पद्धतीने मोठमोठ्या ब्रम्हज्ञान असणाऱ्या लोकांनाही लाळ घोटावयास लावेल असे महान तत्वज्ञान संत तुकाराम महाराजांनी सांगितले.

'दया तिचे नाव भूतांचे पाळण। आणि निर्दालन कंटकांचे' हाच त्यांनी आपल्या जीवनाचा उद्देश ठरविला होता. सर्वत्र धर्मजागृतीची बीजे संत तुकाराम महाराजांनी रूजविली. संत तुकारामांचे कार्य सामाजिक क्षेत्रात अत्यंत महत्वाचे आहेत. समाजाविषयी असलेल्या कळवळ्यातून व प्रेमरूपी अमृताने त्यांची वाणी भिजल्यामुळे त्याला अमृताहून जास्त गोडी प्राप्त झाली आहे.

संत तुकाराम महाराजांना आपल्या अभंगातून समाजाला नीतिबोध तर शिकवायचा होता सोबतच हा नीतिबोध शिकविण्याच्या मार्गामध्ये येणाऱ्या अंधश्रद्धा, रूढी, प्रथा, परंपरा, दांभिकत्व व ढोंगबाजी

यावर हल्ला सुद्धा चढवायचा होता. तुकारामांनी अंधश्रद्धेच्या आहारी गेलेल्या समाजाला कार्य करण्याची चालना दिली. कर्मप्रवृत्तीला खुप महत्व तुकारामांनी दिले. सर्वव्यापी अशा परमात्म्याचे चिंतन सोडून जाखाई-जोखाई यासारख्या क्षुद्र देवतांच्या आराधना करण्यापासून त्यांना परावृत्त केले. भक्ताची दृष्टी कशी डोळस असायला हवी त्याची जाणीव त्यांनी लोकांना करून दिली.

झालों म्हणती त्याचे मज वाटे आश्चर्य।
ऐका नव्हे धीर वचन माझे।।१।।
शिजलिया अन्ना ग्वाही दांत हात।
जिव्हेसी चाखतां न कळे कैसे।।२।।
तापलिया तेला बावन चंदन।
बुंद एक क्षण शीतळ करी।।३।।
पारखी तो जाणे अंतरीचा भेद।
मूढजना छंद लावण्याचा।।४।।
तुका म्हणे कसी निवडे आपण।
शुद्ध मंद हीन जैसे तैसे।।५।।'[१३]

तुकाराम महाराज म्हणतात तापलेल्या तेलामध्ये अस्सल चंदनाचा उगाळून एक थेंब टाकला, तर ते एका क्षणामध्ये थंड होते. ज्या वस्तूचा जो परीक्षक आहे त्याच्या हातात ती वस्तू आली असता त्यातील अंतरधर्म त्यास कळतो आणि जे मूढ जन आहेत ते आतील भाग न जाणता वरवरच्या सौंदर्यामध्ये गुंतुन पडतात. तुकाराम महाराज म्हणतात, सोने कसेही असो ते कसोटीला लावले म्हणजे त्याचे शुद्धत्व, मंदत्व व हिनत्व जसे असेल तसे निवडले जाते. अशारितीने बाह्य अवडंबराच्या आहारी न जाता अंतरीच्या तळमळीने केलेली भक्ती हीच केवळ शुद्ध भक्ती ठरते.

ज्यामध्ये ओलावा नाही अशा खोट्या गोष्टी समाजाला सांगून काय उपयोग ? ज्यापासून आपले हित होईल ते मोठ्या लवकर करून घ्यावे. कोरड्या गोष्टी सांगण्यापासून वाटचालीची खोटी होईल. तुकाराम महाराज म्हणतात, जर चांगल्या सोन्याचे डाक देवून अलंकार केले, तर ते रसायनाची पुटे दिल्यावाचून होणार नाहीत.

'कोरडिया ऐशा काय सारू गोष्टी।
करूं उठाउठी हित आधी।।१।।
खोळबंला राहे आपुला मारग।
पहावी ते मग तुटी कोठे।।२।।
लौकिकाचा आड येईल पसारा।
मग येरझारा दुःख देती।।३।।
तुका म्हणे डांख लागे अळंकारे।
मग नव्हे खरें पुटाविण।।४।।'[१४]

सामाजिक जीवन जगण्याकरिता आवश्यक असणारी सामाजिक व अध्यात्मिक मूल्ये समाजात रूजविण्याचे कार्य संत तुकाराम महाराजांनी केले. प्रपंच आणि परमार्थ यांचा सुंदर समन्वय साधण्याचा प्रयत्न संत तुकारामांनी केला.

## भोंदूपणा, ढोंग, वेद नाकारून नामस्मरणाचा पुरस्कार

संत तुकाराम महाराजांनी विवेक निष्ठेला महत्व दिले. समाजातील दांभिकता, अंधश्रद्धा, कर्मकांड आदी विकृतश्वर तुकोबांनी कठोर प्रहार केले. त्यांनी समाजाला सदाचार शिकविला. केवळ अंगारा धुपारा केल्याने भगवंत प्रसन्न होत असेल तर मग इतर यत्न करण्याचे काय प्रयोजन ? सोवळा आणि ओवळा मानण्यास तुकाराम महाराज तयार नाहीत. जो परदारा, परनिंदा व परपीडा यापासून दूर राहतो तोच सोवळा

व यांच्या आहारी जो जात असेल तोच ओवळा अशी सोपी विभागणी संत तुकाराम महाराज करतात. तुकाराम महाराजांनी आपल्या अभंगातून कर्माला महत्व दिलेले आहे.

'घरी रांडापोरे मरती उपवासी।
सांगे लोकापासी थोरपणा।।
नेऊनिया घरा दाखवावे काय।
काळतोंडा जाय चुकावूनि।।

(सार्थ श्री तुकारामाची गाथा, अ. क्र. २६४५)

आपल्या कर्मापासून दूर राहून समाजामध्ये मोठे म्हणून मिरविणाऱ्या लोकांचा संत तुकाराम महाराज उपहास करतात. असे लोक त्यांच्या घरी जर कोणी आले तर ते आपले तोंड लपवितात, तुकोबा महाराज त्या लोकांना उद्देशून काळतोंडे असे म्हणतात. जे अभक्त आहेत, त्यांच्या गावांमध्ये साधूंची योग्यता ही काय आहे ? तेथे साधू म्हणजे वाघाच्या तावडीत गाय सापडल्यासारखे होय. कसायाच्या आळीमध्ये कोणी बैलाची शपथ घालू लागला तर त्याला ती काय प्रमाणभूत आहे ? हे स्पष्ट करतांना संत तुकाराम महाराज म्हणतात,

'अभक्तांचे गांवी साधु म्हणजे काय।
व्याघ्रवाडां गाय सांपडली।।१।।
कसाबाचे आळी मांडिले प्रमाण।
बस्वण्णाची आपण तया काई।।२।।
मोतियाची गोणी मांळ्या ओळी नेली।
पुसती केवढ्या केल्या पासरी हे।।३।।

अशारितीने रोजच्या व्यवहारातील सोपी उदाहरण देवून ते आपला सिद्धांत पटवून देतात. एकंदरित अंधश्रद्धा निर्मूलनाच्या कार्यात संत तुकाराम महाराजांचे कार्य मैलाचा दगड ठरते. अंधश्रद्धेला दूर सारून तुकाराम

महाराजांनी धर्माचे शुद्ध स्वरूप समाजापुढे मांडले. समाजामध्ये असलेल्या अज्ञानाचा फायदा घेवून सामान्यांना फसविणाऱ्या ढोंगी लोकांचा प्रखर शब्दात निषेध तुकाराम महाराज करतात. पोटभरू धंदे करणाऱ्या साधुसंतांचा ते आपल्या अभंगातून चांगलाच परामर्श घेतात. क्षुद्र देवतांचा त्याग करून नामस्मरणाच्या मार्गाचा अवलंब करायला ते समाजाला सुचवितात. अंधश्रद्धेमुळे शुद्ध भाव बाजूला होवून सर्वत्र विकृती कशी पसरते याचे चित्रण आपल्या अभंगातून संत तुकाराम महाराज करतात. समाजामध्ये भक्तीच्या तत्वातून नीतिबोध त्यांना रूजवायचा होता. त्या मार्गाच्या आड येणाऱ्या अंधश्रद्धांचा अव्हेर त्यांनी केला. भक्तीचे सुलभ तत्व समाजाला देवून सामान्य मानसाला डोळस दृष्टी त्यांनी प्रदान केली. संत एकनाथांप्रमाणेच संत तुकाराम महाराज देखील आदर्श लोकशिक्षक ठरतात यात शंका नाही.

स्वतःच्या स्वार्थासाठी इतरांना फसवून त्यांच्याकडून आपला स्वार्थ साध्य करून घेणाऱ्या ढोंगी लोकांना इतरांना न फसविण्याची व न दुखविण्याची सूचना संत तुकाराम महाराज आपल्या अभंगातून करतात. अंधश्रद्धांना खतपाणी घालून स्वतःलाच देव समजणाऱ्यांवर विश्वास ठेवणे ही अंधश्रद्धा होय असे तुकाराम महाराज म्हणतात. परमेश्वराचे अस्तित्व चराचरात आहे तो दगडात नाही असे सांगून दगड, मंदिराच्या माध्यमातून समाजामध्ये भक्तिस्तोम पसरविणाऱ्यांचा तुकोबा परखड समाचार घेतात. अंगामध्ये देवांचा संचार करून घेणे हे तर त्यांना अघोरी कृत्य वाटते. सत्याची जाणीव तुकाराम महाराजांनी समाजाला करून दिली. अंद्धश्रद्धा निर्मूलनाच्या कार्यामध्ये संतांनी जी कामगिरी केली त्यात संत तुकाराम महाराजांचे योगदान फार मोठे आहे. त्यांच्या या कार्यामुळेच प्रभावित होवून आधुनिक काळातील थोर संत गाडगेबाबा यांनी त्यांचे शिष्यत्व

पत्करले व आपण जे काही बोलतो आहे ते तुकोबांच्या प्रेरणेनेच असे वारंवार आपल्या कीर्तनातून त्यांनी सांगितले.

त्यांच्या काळात वेदांना अपार महत्व होते, वेद प्रमाण मानल्या जात होते. अशा परिस्थितीत वेदातील अनिष्ट गोष्टीवर आपल्या लेखणी व वाणीतून कठोर प्रहार केले. वेदांचा खरा अर्थ त्यांनी समाजाला समजावून सांगितला. धर्म म्हणजे काय ? अधर्म म्हणजे काय ? याचा अर्थ त्यांनी समाजाला समजावून सांगितला. आपल्या जन्माचे प्रयोजनच मुळात हे आहे हे त्यांनी ठोसपणे सांगितले.

'चारी वेद जयासाठी। त्याचे नाम धरा कंठी।।
न करी आणीक साधन। कष्टसी का वायावीण।।
अठरा पुराणांचे पोटी। नामावीण नाही गोठी।
गीता जेणे उपदेशिली। तेही विटेवरी माऊली।।
तुका म्हणे सार धरी। वाचे हरिनाम उच्चारी।।'[१५]

संत तुकाराम महाराजांनी नामस्मरणाला सर्वोच्च स्थान देवून सामान्यजनांसाठी भक्तीचा सुलभ मार्ग खुला करून दिला. विठ्ठल हे दैवत अख्ख्या महाराष्ट्राला दिले. अठरा पुराणांमध्ये सुद्धा नामस्मरणाएवढी शक्ती नाही हे अधिकारवाणीने सांगितले.

वेद वगैरे नाकारून विठ्ठलाला शरण जाण्याचा सल्ला आपल्या अभंगातून तुकोबा देतात. हरिभक्तीचा सिद्धांत त्यांनी आपल्या अभंगातून मांडला. हरिभक्ती सोडून वाईट मार्गाचा अवलंब करणाऱ्यांना ते चांगलेच खडसावतात.

'सूकरासी विष्ठा माने सावकाश। मिष्टान्नाची त्यास काय गोडी।।
तेवी अभक्तासी आवडे पाखांड। न लगे त्या गोड परमार्थ।।
श्वानासी भोजन दिले पंचामृत। तरी त्याचे चित्त हाडावरी।।
तुका म्हणे सर्पा पाजिलिया क्षीर। वमिता विखार विष जाले।।'[१६]

अशा अभक्त व धर्मापासून दूर जाणाऱ्या व्यक्तीला ते डुक्कर, श्वान, सर्प आदींची उपमा देवून त्याचा धिक्कार करतात. तुकाराम महाराज म्हणतात आधीच्या संतांनी सांगितल्याप्रमाणे कलियुगात सर्वत्र अनाचार माजत चालला आहे. ही परिस्थिती जर दूर करायची असेल तर समाजात पसरलेली घोर अंधश्रद्धा दूर करणे अत्यंत गरजेचे आहे व ते कार्य अव्याहतपणे तुकोबांनी केले. आपल्या अभंगातून छोट्या-छोट्या सुविचारांच्या माध्यमातून अंधश्रद्धेविरोधी आपले विचार त्यांनी समाजातील तळागाळापर्यंत पोहोचविले.

वर्णाश्रमाला तुकाराम महाराज विरोध करीत नाही फक्त प्रत्येकाने वर्णाश्रमधर्माचे योग्यरितीने पालन करावे जेणेकरून समाजाची घडी विस्कटणार नाही. एक पुरागामी डोळस संत म्हणून संत तुकाराम महाराजांचा उल्लेख करता येतो. तर्काधिष्ठीत विचार, बुद्धिप्रामाण्यवादी यात तर त्यांचा हातखंडा आहे. विज्ञानवादी विचार त्यांनी व्यक्त केले. रूढी, प्रथा, कर्मकांड, सामाजिक विषमता, स्त्री-पुरूष भेद, जातीभेद, आर्थिक विषमता, क्षुद्र देवतांची आराधना, त्यातून पुढे येणाऱ्या बळी देण्यासारख्या पद्धती, विविध अंधश्रद्धा या सर्वांना समाजातून हद्दपार करून एका सशक्त समाजाच्या निर्मितीचे स्वप्न त्यांनी पाहिले. 'तुका झालासे कळस' ही बहिणाबाईंची ओळ सार्थ ठरते.